# अखिल भारतीय कोरडवाहू शेती संशोधन प्रकल्प,

## डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला

जा.क्र.अभासकोशेसंप्र/भांडार/ ४८ /२०२६ दिनांक: ०१/ ०६ /२०२६

**जाहीर लिलाव**

**विषय :- अ.भा.स. कोरडवाहू शेती संशोधन प्रकल्प अंतर्गत असलेले निरूपयोगी व नादुरूस्त अशा अचलवस्तु, जडवस्तु, यंत्रसामुग्री, संगणक, ईतर साहित्य व वस्तूंची विक्री करण्याबाबत जाहीर लिलाव.**

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने आपणास कळविण्यात येते की, अखिल भारतीय समन्वयीत कोरडवाहू शेती संशोधन प्रकल्प, डॉ. पं.दे.कृ.वि., अकोला या प्रकल्पांतर्गत आयुमर्यादा समाप्त झालेल्यापैकी निरूपयोगी व नादुरूस्त अशा अचलवस्तु, जडवस्तु, यंत्रसामुग्री, संगणक, ईतर साहित्य व वस्तूंची विक्री जाहीर लिलाव रीतसर प्रक्रियेद्वारे करणे प्रस्तावित आहे. त्या अनुषंगाने सदर वस्तू अखिल भारतीय समन्वयीत कोरडवाहू शेती संशोधन प्रकल्प, डॉ. पं.दे.कृ.वि., अकोला या प्रकल्पामध्ये प्रक्षेत्रावर पाहणी करण्याकरिता ठेवण्यात आलेले आहे. सदरील वस्तूंची व्यक्तिशः पाहणी करण्याकरिता कार्यालयीन वेळ सकाळी १०.०० ते सायंकाळी ६.०० पर्यंत ठेवण्यात आली आहे.

उपरोक्त वस्तूंची विक्री करण्याकरिता खुला जाहीर लिलाव दिनांक ११/०६/२०२६ रोजी गुरूवार या दिवशी समितीद्वारे आयोजित करण्यात आला आहे. यामध्ये बोली बोलणारे व्यक्ति तथा संस्था यांनी सकाळी १० वाजता उपस्थित राहून बोलीकरिता अनामत रक्कम रूपये २००० /- रोख स्वरूपात कार्यालयात भरावी लागेल. त्यानंतरच बोली बोलण्याकरिता लिलावामध्ये सहभागी होता येईल.

**प्रमुख शास्त्रज्ञ**
**कोरडवाहू शेती संशोधन प्रकल्प,**
**डॉ. पं.दे.कृ.वि., अकोला**

**निरूपयोगी व नादुरूस्त अशा अचलवस्तु, जडवस्तु, यंत्रसामुग्री, संगणक व ईतर साहित्य व वस्तूंची विक्री करण्याकरिता जाहीर लिलावाच्या अटी व शर्ती**

अखिल भारतीय समन्वयीत कोरडवाहू शेती संशोधन प्रकल्प, डॉ. पं.दे.कृ.वि., अकोला या प्रकल्पांतर्गत आयुमर्यादा समाप्त झालेल्यापैकी निरूपयोगी व नादुरूस्त अशा अचलवस्तु, जडवस्तु, यंत्रसामुग्री, संगणक, ईतर साहित्य व वस्तूंच्या विक्रीचा जाहीर लिलाव खालील अटी व शर्ती नुसार करण्यात येईल.

१. लिलावाच्या दिवशी ठरलेल्या वेळेवर योग्य बोली बोलणारे हजर नसल्यास त्याच दिवशी अर्ध्या तासाने बोली करण्यात येईल जर एकच व्यक्ती बोली बोलणारा असेल तर लिलाव रद्द करण्यात येईल हा निर्णय लिलाव कमेटी घेईल.

२. लिलावामध्ये बोली बोलणा-यास **रू. २००० /- अग्रीम अनामत रक्कम रोख** स्वरूपात भरावी लागेल.

३. बोली बोलणा-या व्यक्तीची जास्तीत जास्त बोली मान्य असेल, अशा व्यक्तीला लिलावाची बोली पाहून लिलाव समितीमार्फत मान्यता देण्यात येईल. त्याबाबतचा अंतिम निर्णय गठीत समिती घेईल. अपेक्षित किंमत आल्याशिवाय लिलावाची बोली मान्य करणे लिलाव समितीच्या निर्णयावर अवलंबून राहील.

४. बोली बोलणा-याने जमा केलेली अग्रीम अनामत रक्कम ज्यांनी लिलाव घेतला असेल त्या व्यतिरिक्त इतर सर्वांना त्याच दिवशी परत करण्यात येईल. ज्यांनी लिलाव घेतला असेल त्यांची रक्कम बोली किंमतीत जमा केली जाईल व त्याच दिवशी **संपूर्ण रक्कमेच्या ५० टक्के रक्कम** बोली सपल्याबरोबर भरावी लागेल.

५. लिलावास योग्य किंमत न आल्यास लिलाव रद्द करण्याचा अधिकार लिलाव कमेटीकडे राहील.

६. लिलाव कोणत्याही कारणास्तव रद्द करण्याचा अधिकार गठित समितीकडे राखून ठेवला आहे.

७. दोन बोली पूर्ण झाल्यानंतर मा. संचालक संशोधन, डॉ. पं.दे.कृ.वि., अकोला यांची मंजूरी मिळाल्यानंतर तिसरी बोली पुर्ण होईल. त्यांची मंजुरी न मिळाल्यास जमा केलेली रक्कम वापस करण्यात येईल.

८. लिलावाची पार्टी निश्चित झाल्यानंतर किंवा लिलाव निश्चित झाल्यानंतर **उर्वरित ५० टक्के रक्कम तीन दिवसाच्या आत भरावी लागेल.** त्याशिवाय साहित्याची उचल करणे व वाहून नेण्याची परवानगी मिळणार नाही. लिलावाबाबत काही तक्रार असल्यास त्याच दिवशी तशी लेखी स्वरूपात लिलावाच्या ठिकाणी लिलाव संपेपर्यंत द्यावी.

९. अटीनुसार पैसा जमा न केल्यास विद्यापीठ एकतर्फी निर्णय घेऊन लिलाव रद्द करू शकतील. न्यायालयीन कार्यवाही अकोला क्षेत्रापुरती मर्यादीत राहील.

१०. लिलाव समितीचे सदस्य व सबंधित कार्यालयीन कर्मचारी लिलावाच्या ठिकाणी उपस्थित राहू शकतील व निरिक्षण करतील.

११. बोली कायम झाल्यास सबंधित व्यक्तीनी सर्व साहित्याची उचल करणे व वाहून नेण्याबाबतची परवानगी मा. प्रमुख शास्त्रज्ञ, कोरडवाहू शेती संशोधन प्रकल्प, डॉ. पं.दे.कृ.वि., अकोला यांची घ्यावी लागेल. लिलावात समाविष्ट असलेले साहित्य मोजमाप झाल्यानंतर देण्यात येईल. तसेच सर्व साहित्य ताब्यात मिळताच स्वखर्चाने उचल करणे व वाहून नेण्याची व जोखमेची जबाबदारी संबंधित व्यक्तीची/लिलाव घेणा-यांची राहील.

१२. लिलाव घेणा-यांनी स्वखर्चाने १००रू. च्या स्टॅम्पपेपरवर लिलावाबाबतचा करारनामा लिहुन द्यावा लागेल.

१३. कोणत्याही कारणास्तव लिलाव घेणारा व अधिकारी यांच्यात वाद निर्माण झाल्यास त्या क्षणापासुन योग्य निर्णय लागेपर्यंत साहित्याची उचल करता येणार नाहीत. वरील प्रकरणाबाबत मा. संशोधन संचालक यांचा निर्णय अंतीम व बंधनकारक राहील.

Officer In Charge, Agricultural Research Station, Dr. P.D.K.V., Akola
Inward No. 121
Dt.: 21/06/2026